प्रकरण १ ले

# मराठी आत्मकथन : संकल्पना व स्वरूप

# प्रकरण १ ले

# मराठी आत्मकथन : संकल्पना व स्वरूप

## १.१ प्रास्ताविक :

२० व्या शतकातील समृद्ध वाङ्मयनिर्मितीची चिकित्सा करताना १९ व्या शतकाच्या किंवा अव्वल इंग्रजी कालखंडात जी आधुनिक मराठी वाङ्मयाची पायाभरणी झाली तिचा विचार करणे महत्त्वाचे ठरते. या कालखंडात निर्माण झालेल्या मराठी वाङ्मयातून व प्रेरणा घेऊनच स्वातंत्र्योत्तर कालखंडात वेगवेगळे वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. १८ वे शतक हे मराठी माणसाच्या वैचारिकतेला वेगळे वळण देणारे शतक होते. तत्कालीन सामाजिक व राजकीय स्थिती अत्यंत धामधुमीची होती. इंग्रजी राजवटीमुळे संपूर्ण समाजजीवन ढवळून निघाले होते. पारतंत्र्याच्या जाणिवेने संपूर्ण भारतीयांची मने करपून गेली होती. या सर्व परिस्थितींतून समाजाला बाहेर काढण्यासाठी १९ व्या शतकात अनेक वाङ्मयप्रकार उदयास आले. एका अर्थाने स्वातंत्र्योत्तर कालखंडात जी विपुल स्वरूपात वाङ्मयनिर्मिती झालेली दिसते त्याची पायाभरणी १९ व्या शतकात झाली आहे असे वाटते.

निबंध, कादंबरी, नाटक, कविता या वेगवेगळ्या वाङ्मयातून मराठी वाङ्मय समृद्ध झाले आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतर देशात शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. शिक्षणाची दारे सर्व समाजांतील वेगवेगळ्या जातिजमातींसाठी खुली झाली. ग्रामीण भागातही शिक्षणाची सोय झाली. त्यामुळे मराठी साहित्यामध्ये अनेक नवनवीन वाङ्मयप्रवाह उदयास आले. त्याच्यामध्ये ग्रामीण, दलित, जनवादी, स्त्रीवादी, देशी, आदिवासी, विज्ञान अशा विविध प्रवाहांतून वाङ्मयनिर्मिती होऊ लागली.

त्याचबरोबर समाजातील लोकांना शिक्षण मिळू लागल्याने सुशिक्षित पिढीने आपल्या सुख-दु:खाचे अनेक अंगाने चित्रण साहित्यातून मांडण्यास सुरुवात केली. चरित्र, आत्मचरित्र व आत्मकथन असे वाङ्मयप्रकार उदयास आले. आत्मकथन हा वाङ्मयप्रकार विशेषत: दलित साहित्याने पुढे आणला व तो लक्षवेधी ठरला. अनेक आत्मकथने प्रकाशित झाली, साहित्यिक व समीक्षक यांबद्दल विचार करू लागले. चरित्र, आत्मचरित्र व आत्मकथन या दोन्ही वाङ्मयप्रकारांबाबत चर्चा होऊ लागली. म्हणूनच त्याचे स्वरूप, वैशिष्ट्ये याच्या आधारे या प्रबंध लेखनाचा हेतू डोळ्यासमोर ठेवून अभ्यास केला आहे.

## १.२ चरित्र :

चरित्र हे स्वत: लिहावयाचे नसून स्वत:खेरीज अन्य व्यक्तीने लिहावयाचे असते. एखाद्या व्यक्तीच्या जीवनात घडून गेलेल्या घटनांचा व त्याने केलेल्या कार्याचा इतिहास चरित्र या वाङ्मय प्रकारात असतो. एका व्यक्तीचे चरित्र अनेकवेळा लिहिले जाऊ शकते. चरित्रकार ज्या व्यक्तीचे चरित्र लिहितो त्या व्यक्तीच्या कार्याचा सर्व अंगाने वेध घेत असतो व त्याच्या जीवनात घडलेल्या घटना मांडतो. चरित्रकार हा चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाने भारावलेला असतो. चरित्रकाराला चरित्रनायकाचे व्यक्तिमत्त्व स्वत:ला जसे प्रतीत झाले असेल, जसे भावले असेल तसे व्यक्त करण्याचे त्याला स्वातंत्र्य असते. थोडक्यात चरित्र म्हणजे एका व्यक्तीने दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचा घेतलेला शोध, केलेला पाठपुरावा म्हणजे चरित्र होय. अशी चरित्राची सर्वसामान्य व्याख्या करता येईल.

पुरुषोत्तम दिगंबर धर्माधिकारी यांनी ''चरित्र म्हणजे एखाद्या अष्टपैलू माणसाची नैतिकता, त्यांचा भावनिक विकास यांचा अभ्यास''[१] अशी चरित्राची व्याख्या केली आहे.

मराठी वाङ्मयाचा इतिहासात चरित्र-आत्मचरित्र यांची कमतरता जाणवत नाही. परंतु इंग्रजांचे आगमन झाल्यानंतर इंग्रजी साहित्याच्या प्रभावाने मराठीत चरित्र-आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारात भर पडली. हे खरे असले तरी इंग्रजी साहित्याच्या अगोदर चरित्रलेखनाचा प्रयत्न झालेला आढळतो. त्याच्यामध्ये महानुभाव पंथाचे संस्थापक श्री चक्रधरस्वामी यांचे लीळाचरित्र, गुरुचरित्र, महिपतींनी लिहिलेली संतचरित्रे यांच्यापासून ते पेशवाईतील सुप्रसिद्ध मुत्सद्दी नाना फडणवीस यांच्या आत्मचरित्रापर्यंत अनेक चरित्र-आत्मचरित्र लेखनाचे प्रयत्न झालेले दिसतात.

लीळाचरित्र, गुरुचरित्र, संतचरित्र यानंतरच्या काळात परमार्थिक नव्हे तर देशहिताच्या दृष्टीने तसेच समाजहिताच्या दृष्टीने पराक्रमी ठरलेल्या थोर पुरुषांची चरित्रे लिहिण्याचा प्रयत्न झाला. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र त्याचबरोबर नाना फडणवीस यांचे चरित्र या काळात जसे पुरुषांची जशी चरित्रे लिहिली गेली तशा स्त्रियाही पराक्रमी होत्या. त्यांचीसुद्‌धा चरित्रे लिहिण्याचा प्रयत्न झाला.

चरित्र हे कर्तव्याने महान व पराक्रमी असलेल्या व्यक्तींची लिहिली जातात. त्यांनी केलेल्या कार्याची आठवण मागील पिढीस व्हावी यासाठी चरित्र लिहून त्यांचा आदर्श प्रत्येक नवीन पिढीला मिळावा हा उद्देश असतो. एकूणच चरित्र म्हणजे एखाद्या कर्तृत्वाने महान असलेल्या व्यक्तीच्या कर्तृत्वाचा दुसऱ्या व्यक्तीने माहितीच्या आधाराने, अनेक घटनांवरून घेतलेला आढावा होय असे म्हणता येईल.

"चरित्र म्हणजे आचरण कृत्ये क्रियावर्तन अवस्था, स्थिती, देवांचे, वीरांचे पराक्रम, महाकृत्ये, मर्दुमकीची कामे, इतिहास, व्यक्तीचा आयुष्यक्रम वर्णन करणारा ग्रंथ."[२] अशी चरित्राची व्याख्या महाराष्ट्र शब्दकोषाकार य. रा. दाते यांनी केलेली आहे; तर कलात्मक व्यक्तिदर्शन म्हणजे व्यक्ती चरित्र अशी व्याख्या चिपळूणकरांनी लिहिलेल्या जॉन्सच्या चरित्रात केलेली दिसते. त्याचबरोबर वसंत आबाजी डहाके यांनी केलेली व्याख्या महत्त्वाची वाटते. ते म्हणतात - "माणसाचा आयुष्यक्रम कथन करणारा ग्रंथ (biography) म्हणजे चरित्र होय."[३] वसंत आबाजी डहाके यांच्या मते चरित्र म्हणजे आयुष्यात घडून गेलेल्या घटनांची क्रमानुसार मांडणी केलेला ग्रंथ म्हणजे चरित्र असे त्यांच्या व्याख्येतून सांगतात. चरित्रांच्या अनेक समीक्षकांनी व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. थोडक्यात चरित्राबाबत असे म्हणता येईल की एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचा घेतलेला शोध होय. चरित्रात व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत घडलेल्या प्रसंगाचा, सुखदु:खाचा, कार्याचा इतिहास असतो. चरित्र हे परिपूर्ण असते.

## १.३ आत्मचरित्राचे स्वरूप :

आत्मचरित्र हा चरित्र या वाङ्मयप्रकारासारख्या एक वाङ्मयप्रकार आहे. आत्मचरित्र हे स्वत:चे स्वत:च लिहावयाचे असते. चरित्र मात्र एखाद्या व्यक्तीचे दुसऱ्या व्यक्तीने लिहिलेले असते. आत्मचरित्रकार हा स्वत: आत्मचरित्राचा नायक असतो. तो स्वत: आपल्या गतजीवनाचा इतिहास मांडत असतो. चरित्रात मात्र चरित्रकार तिऱ्हाईत व्यक्ती असते. आत्मचरित्र हे आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात लिहिले जाते. तर चरित्र हे एखाद्या अष्टपैलू व पराक्रमी किंवा असामान्य कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर व्यक्तीच्या मृत्यूनंतर लिहिता येते. चरित्र आणि आत्मचरित्र हे वाङ्मयप्रकार एक असले तरी त्यांच्यात सूक्ष्म असे भेदही आहेत.

चरित्रामध्ये चरित्रलेखक व ज्यांच्यावर चरित्र लिहावयाचे आहे ती व्यक्ती अशा दोन भिन्न व्यक्ती असतात. त्यामुळे चरित्राप्रमाणे आत्मचरित्र हे कधीच पूर्ण असू शकत नाही. आत्मचरित्राच्या संदर्भात अ. म. जोशी म्हणतात, "कोणत्याही आत्मचरित्रात एखाद्या व्यक्तीच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतची संपूर्ण हकिकत येणे शक्य नाही या अर्थाने ती अपूर्णच असतात. म्हणून त्यांचे 'मस्तक व अवयवरहित मूर्ती' असे वर्णन डब्ल्यू. एच. डन यांनी केलेल्याचा उल्लेख चरित्र-आत्मचरित्र या ग्रंथात केला आहे."[४]आपल्या मनातील सुख-दु:ख दुसऱ्याला सांगून आपल्या मनाचा ताण कमी करून आपले अंत:करण हलके करावे या हेतूने आत्मचरित्रे लिहिली जातात. निरनिराळ्या

वाङ्मयप्रकारांपैकी सर्वांत सोपा व सर्वांत अवघड वाङ्मयप्रकार म्हणजे आत्मचरित्र होय असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

आत्मचरित्र हा सर्वांत सोपा वाङ्मयप्रकार अशा अर्थाने की त्याकरिता कथा कादंबरी, नाटक, कवितेप्रमाणे कल्पनाशक्तीची फारशी आवश्यकता भासत नाही. आत्मचरित्र लेखनासाठी तीव्र व दीर्घ व्यासंगाची आवश्यकता नसते. शास्त्रीय ग्रंथाला आवश्यक असणारी बुद्धिमत्ता असावी असेही नाही. शिवाय उत्तम कलाकृती निर्माण करण्याकरिता लागणारी समरसता आत्मचरित्राच्या बाबातीत शक्य आहे तितकी दुसऱ्या कोणत्याही प्रकारात आढळणार नाही. स्वत:च स्वत:चे प्रतिबिंब आरशात पाहण्यास माणूस जितका समरस होतो, तितका दुसऱ्याचे प्रतिबिंब पाहण्यास समरस होत नाही. ही माणसाची सहज प्रवृत्ती आहे.

आत्मचरित्रात आत्मदर्शन असावे, परंतु आत्मसमर्थन नसावे. हे आत्मचरित्र केवळ आत्मदर्शनाच्या हेतूने लिहिले जाते. त्यातही विश्वात्मक अवतरण्याची शक्यता असते. तेथे आत्म-चरित्रामध्ये व्यक्त झालेल्या लेखकाची भूमिका ही एखाद्या कलावंताच्या भूमिकेसारखी असते. हा कलावंत स्वत:पासून स्वत:ला दूर करून स्वत:चे चित्र रेखाटीत असतो. तो स्वत:च रंगून गेलेला असतो.

आत्मचरित्रामध्ये स्वत: लेखक हा नायक असतो. तो स्वत:च्या गतजीवनाचा पुन्हा एकदा तटस्थपणे परिचय करून देत असतो. स्वत: लेखक हा आत्मचरित्राचा केंद्रबिंदू असतो. तो स्वत:च्या जीवनातील काही ठळक घटनावार प्रसंगांची नोंद करीत असतो. स्वत:च्या जीवनात घडलेल्या सर्वच घटनांची प्रसंगांची नोंद करताना अनावश्यक बाबींना तो टाळीत असतो. आत्मचरित्रकार आपल्या मन:प्रवृत्ती लोकांपुढे उघड्या करून दाखवीत असतो. स्वत:ला स्वत:ची जितकी परिपूर्ण माहिती असेल तितकी दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीला असू शकत नाही. अंगातून काढलेल्या सदऱ्याप्रमाणे आपले अंत:करण उलटे करून त्याची आतली बाजू उघडी करून दाखवत असतो. म्हणूनच आत्म-चरित्रामध्ये त्या व्यक्तीचे चित्र न उमटता चरित्र उमटत असते. आत्मचरित्रात नेमके हेच अपेक्षित असते.

लेखकाने आपल्या व्यक्तिगत जीवनाची स्वत:च्या शब्दांत सांगितलेली कहाणी म्हणजे आत्मचरित्र होय असे स्थूलपणे म्हणता येईल. तसे पाहता आत्मचरित्र लिहिणे साधी-सोपी गोष्ट नव्हे. कारण व्यक्ती ज्यावेळी स्वत:च्या जीवनाकडे स्वत:च डोकावते त्यावेळी त्या व्यक्तीला स्वत:पासून काही गोष्टी या तटस्थपणे पाहता येणे गरजेचे असते. स्वत:शी स्वत:च प्रामाणिकपणे, तटस्थपणे पाहून स्वत:च्या जीवनातील अनुभव व्यक्त करावयाचे हे वाटते तितके सोपे काम नव्हे.

वा. ल. कुलकर्णी यांच्या मते, ''स्व:पासून स्वत:ला आलिप्त करून स्वत:च न्याहळण्यात जो रंगून जाऊ शकतो, त्याचे सम्यकदर्शन व्हावे. एतदर्श धडपड करताना दिसतो तोच खरे आत्मचरित्र लिहू शकतो.''[५] हे वा. ल. कुलकर्णी यांचे मत योग्य वाटते. आत्मचरित्रलेखन करताना व्यक्तीला स्वत:पासून काहीवेळा अलिप्त व्हावे लागते. स्वत:च स्वत:चे रूप न्याहाळावे लागते. ते ज्याला चांगले जमते त्यालाच आत्मचरित्र लिहिता येते.

आपल्या जीवनामध्ये आता करण्यासारखे फारसे काही नाही, असे ज्यावेळी लेखकाला वाटते त्यावेळी व्यक्तीला भरपूर असा मोकळा वेळ असतो. त्यावेळी त्या व्यक्तीला आपण जगलेल्या जीवनातील आठवणींचा मागोवा घ्यावासा वाटतो. अशावेळी लेखक पुन्हा आपल्या आयुष्याला उजाळा देण्याचे ठरवितो त्या प्रेरणेवरून आत्मचरित्र लिहिले जाते. अर्थात ही अवस्था कुणाच्या आयुष्यात उत्तरार्धात तर कुणाच्या वयाच्या विसाव्या वर्षी, तर कुणाच्या चाळिसाव्या वर्षी येते. त्यांची उदाहरणे म्हणून किशोर शांताबाई काळे यांचे 'कोल्हाट्याचे पोर', लक्ष्मण माने यांचे 'उपरा'. म्हणून डॉ. विलास खाले म्हणतात, ''चरित्र हे कितीही वेळा लिहिले जाऊ शकते. आत्मचरित्रही पुन्हा पुन्हा लिहिण्यासारखी घटना नव्हे.''[६] कारण चरित्र हे समाजातील ज्या व्यक्ती कर्तृत्वाने महान असतात त्यांचे कार्य हे मागील पिढीला लाभदायक व आदर्श असते. अशा व्यक्तींवर अनेक व्यक्तींनी चरित्रे लिहिली आहेत. त्याचबरोबर चरित्र हे स्वत: लिहावयाचे नसून स्वत:खेरीज अन्य व्यक्तीने लिहावयाचे असते.

आत्मचरित्र मात्र स्वत:च स्वत:चे लिहले जाते. आत्मचरित्र हे व्यक्तीने जन्माला येऊन एकदाच लिहावयाचे असते. म्हणून डॉ. विलास खोले यांचे मत योग्य आहे असे वाटते. तर वसंत मिरासदार यांच्या मते, ''आत्मचरित्रलेखन म्हणजे एक प्रकारचा फुलस्टॉप. मनुष्य कितीही कर्तबगार असेना, त्याचे क्रियाशील आयुष्य जेव्हा संपते तेव्हाच समाजातील व्यक्ती आत्मचरित्र लिहिण्याचा आग्रह धरतात.''[७]

कारण त्या व्यक्तीला जन्माला आल्यापासून जीवनात स्थिर होताना एक ना अनेक चांगले वाईट अनुभव, वेदना, जीवनजाणिवा त्याने भोगलेल्या असतात. त्यांच्या खऱ्याखुऱ्या अनुभवातून समाजाला मार्गदर्शन होत असते. एक वेगळीच दिशा मिळत असते व तत्कालीन समाजपद्धतीचा अभ्यास करणाऱ्या संशोधकाला असे आत्मचरित्र मार्गदर्शक ठरते. व्यक्तीच्या कर्तृत्वाचा बहर संपल्यानंतर त्याला आपल्या जीवनात जे आपण कार्य केले त्याचा पुन्हा उजाळा घ्यावा असे वाटते. याचवेळी व्यक्ती आत्मचरित्र लिहिण्यास प्रवृत्त होतात.

आत्मचरित्राच्या संदर्भात डॉ. सदा कऱ्हाडे यांनी विवेचन केले आहे. "स्वत:च्या जीवनाचे दुरुस्तपणाने सिंहावलोकन वृत्तीने केलेले निवेदन म्हणजे आत्मचरित्र."[८] डॉ. सदा कऱ्हाडे यांची ही व्याख्या म्हणावी तितकी परिपूर्ण वाटत नाही कारण त्यामध्ये तटस्थता, कलात्मकता यांसारख्या अनेक महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकलेला नाही. त्यामुळे कऱ्हाडे यांच्या व्याख्येत काही प्रमाणात दोष दिसून येतो.

"आपल्या जीवनविषयक अनुभवाचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचे स्वत: लेखकाने लेखन रूपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय."[९] ही व्याख्या प्रा. रा. ग. जाधव यांनी मांडली आहे. आत्मचरित्र लिहिणाऱ्या व्यक्तीने आपल्या जीवनात आलेल्या सर्व चांगल्या वाईट अनुभवांचे चित्रण आत्मचरित्रात केलेले असले पाहिजे. एकूणच त्याच्या स्वभावाचे दर्शन हे लेखन रूपाने दाखविले असले पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे.

डॉ. विमल भालेराव यांच्या मते, "स्वत:चे जीवन तटस्थपणे न्याहाळून त्यातून आवश्यक त्या बाबींची निवड करून त्यांचे प्रांजळ निवेदन व कलात्मक मांडणी यांतून स्वचित्र रेखाटणे म्हणजे आत्मचरित्र."[१०] डॉ. विमल भालेराव या असे मत प्रतिपादन करतात की आत्मचरित्र लिहिणाऱ्या व्यक्तीने स्वत:चे जीवन पारखून आवश्यक अशाच प्रसंगाची निवड करावी. त्याचबरोबर त्याचे प्रांजळपणे निवेदन व त्या व्यक्तीला आलेल्या सर्व अनुभवविश्वाला कलात्मक जोड देऊन निर्माण केलेली लेखनरूपातील कलाकृती म्हणजे आत्मचरित्र म्हणता येईल.

वरील सर्व समीक्षकांच्या व्याख्यांचा विचार केला असता प्रा. रा. ग. जाधव, डॉ. विमल भालेराव यांच्या व्याख्यांतून आत्मचरित्रांची संकल्पना स्पष्ट होते. कारण आपल्या जीवनाचे दर्शन व त्या अनुषंगाने लेखकाने कळत नकळतपणे आपल्या स्वभावाचे केलेले चित्रण, त्याचबरोबर व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळ्या प्रसंगांच्या साहाय्याने घडविलेले दर्शन. या सर्व गोष्टी मिळून आत्मचरित्र ठरेल; तर डॉ. विमल भालेराव यांच्या मते स्वत:च्या जीवनातील गुणदोषांकडे तटस्थपणे पाहण्याची दृष्टी ही माणसाकडे असावी लागते. या तटस्थवृत्तीने त्यांतील अनावश्यक भाग वजा करून आवश्यक भाग घेऊन त्याची कलात्मक गुणांच्या साहाय्याने त्याचबरोबर कलात्मक मांडणीने रेखाटलेले चित्रण आत्मचरित्रात येते हे मत आत्मचरित्राच्या व्याख्येला अगदी जवळून स्पर्श करण्याजोगे आहे.

माणसाला जगत असताना आलेल्या सर्वच अनुभवांची मांडामांड म्हणजे आत्मचरित्र नव्हे. त्यामुळे आत्मचरित्र या संकल्पनेचा योग्य बोध होत नाही. डॉ. सदा कऱ्हाडे यांच्या व्याख्येत प्रांजळ निवेदन व कलात्मक मांडणी या महत्त्वाच्या बाबी निसटल्या आहेत. विमल भालेराव यांच्या व्याख्येमध्ये

आत्मचरित्रास आवश्यक असणाऱ्या तटस्थ घटनांची निवड, प्रांजळ निवेदन, कलात्मक निवेदन हे सर्व पैलू आलेले आहेत.

विविध समीक्षकांच्या व्याख्यांवरून आत्मचरित्राच्या बाबतीत असे म्हणता येईल की व्यक्तीला जीवन जगत असताना प्रत्येक क्षणी प्रत्येक दिवशी एक ना अनेक अनुभव येतात. स्वत:च्या जीवनात येणाऱ्या व येऊन गेलेल्या प्रसंगांना तो सामोरे जात असतो. त्यातील सर्वच प्रसंग महत्त्वाचे नसतात. परंतु त्यातील निवडक प्रसंगांना तटस्थपणाने न्याहाळून स्वत:च्या शब्दांतून केलेली मांडणी म्हणजे आत्मचरित्र असे आपणांस म्हणता येईल.

आत्मचरित्र म्हणजे एका अर्थाने स्वत:चा आत्मशोधच असतो. स्वत:कडे ज्याला तटस्थपणे पाहता येते तोच आत्मचरित्र लिहू शकतो. स्वरूपाकडे पाहून गतजीवनाचा तटस्थवृत्तीने काढलेला आलेख म्हणजे आत्मचरित्र होय. आत्मचरित्रकाराला स्वत:च्या जीवनात घडलेल्या सर्व गोष्टींची पूर्ण माहिती असते. त्यामुळे तो वेधक पद्धतीने त्याची मांडणी करीत असतो.

थोडक्यात आत्मचरित्र म्हणजे व्यक्तीने आयुष्यात घेतलेल्या 'स्व' अनुभवाचा आयुष्याच्या सायंकाळी घेतलेला आढावा असे म्हणावे लागेल.

## १.४ चरित्र व आत्मचरित्र यांतील फरक :

चरित्र आणि आत्मचरित्र हे वाङ्मयप्रकार जरी सारखे वाटले तरी याच्यात मूलभूत असा फरक आढळतो. राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रांत उल्लेखनीय व महत्त्वाची कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींची चरित्र लिहिली जातात. परंतु आत्मचरित्र मात्र सर्वसामान्य व्यक्ती लिहू शकते. आत्मचरित्र लेखनास त्या व्यक्तीचे कार्य महान असावे असा अट्टाहास नसतो. एखाद्या व्यक्तींचे चरित्र अनेक लेखक लिहू शकतात. परंतु आत्मचरित्र मात्र स्वत:च स्वत:चे व एकदाच लिहावयाचे असते.

चरित्र हे पूर्ण असते परंतु आत्मचरित्र हे अपूर्ण असते. आत्मचरित्र जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर लिहिले जाऊ शकते. चरित्र लेखन हे एखाद्या व्यक्तीचे दुसरी व्यक्ती करू शकते. आत्मचरित्रात असे होत नाही. आत्मचरित्र म्हणजे स्वत:च स्वत:चे लिहिलेले चरित्र असते. चरित्र आणि आत्मचरित्र हे दोन्ही वाङ्मयप्रकार एकमेकांशी पूरक असले तरी मूलत: ते स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहेत. चरित्रात कोणी तरी कोणाला लेखनविषयक बनवितो तर आत्मचरित्रात खुद्द लेखकच स्वखुशीने स्वत:च लेखन विषय होतो. चरित्रात एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचा दुसऱ्या व्यक्तीने घेतलेला शोध असतो.

आत्मचरित्रात स्वतःच्या जीवनात घडलेल्या सर्व घटनांचा स्वतःच तटस्थपणे मांडलेला इतिहास असतो. आत्मचरित्र हे आयुष्याच्या मावळतीला लिहिले जाते. वरील विश्लेषणावरून चरित्र व आत्मचरित्रातातील मूलभूत फरक लक्षात येण्यास हरकत नसावी.

## १.५ आत्मकथन संकल्पना :

आत्मकथन हा वाङ्मयप्रकार अगदी अलीकडच्या काळात विशेष प्रकाशात आला आहे. आत्मकथन या वाङ्मयप्रकारास दलित लेखकांनी पुढे आणले. आत्मकथन म्हणजे आपल्या जीवनात आपण भोगलेले दुःख, वेदना, उपेक्षा यांचे कथन करणे होय. स्वातंत्र्यपूर्व काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापासून शिक्षणाची प्रेरणा घेऊन हजारो वर्षे समाजातील उपेक्षित वर्गही शिक्षणाच्या प्रवाहात आला. समाजातील व सर्व जातिधर्मांसाठी शिक्षणाची द्वारे खुली झाली. त्याचबरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणा घेऊन दलित समाज आपली दुःखे साहित्यातून मांडू लागला. त्यात आपले दुःख मांडण्यासाठी आत्मकथन हा प्रभावी वाङ्मयप्रकार त्यांनी जवळ केला. त्यातूनच अनेक आत्मकथने जन्मास आली.

आत्मकथनांची संकल्पना व स्वरूप पाहण्यासाठी अनेक समीक्षकांच्या मतांचा आधार घेऊन ते पाहता येईल.

आत्मकथन हा शब्दप्रयोग दलित साहित्यात वापरात आला असून आत्मकथन म्हणजे आत्म्याचे कथन असते. डॉ. भालचंद्र फडके दलित आत्मकथनांना दुःखाची गाथा म्हणतात. तर डॉ. विमल भालेराव यांनी आत्मकथनास स्वकथन असा नव्याने शब्दप्रयोग उपयोगात आणला आहे.

आत्मकथन या संज्ञेचे स्पष्टीकरण करताना डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, ''यातील 'मी' चे भोगणे घडत जाणे हे नुसतेच व्यक्तिगत पातळीवर राहत नाही तर त्याला आम्हीचे स्वरूप प्राप्त होते. असे असले तरी आम्हीचे चित्रण करताना आम्हीतला 'मी' त्यातून कधी वेगळा होऊन पुढे येत नाही. काहीही झाले तरी माणसाला सर्वप्रथम आधी प्रेम असते. म्हणून आत्मचरित्रातील 'मी' अपरिहार्यपणे प्रकट होतो.''[११] या ठिकाणी दलित आत्मकथनातील 'मी'चे भोगणे जगणे केवळ एकट्याचे नसून ते त्या आत्मकथनातून अनेक व्यक्तींचे असते. एकूणच आत्मकथनातून समाजाचे चित्रण येते म्हणून ते व्यक्तिगत पातळीवरती राहत नाही. दैनंदिन जीवन जगत असताना जे अनुभव आलेले असतात ते अनुभव लेखक आत्मकथनात्मक कालकृतीच्या माध्यमातून समाजापुढे मांडतो. आत्मकथनाचा नायक नामधारी असतो. यामध्ये भोवतालचा समाज आणि वास्तव परिस्थिती यांचे चित्रण अधिक प्रमाणात असते.

आत्मकथनाचे स्वरूप स्पष्ट करताना डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, ''आत्मकथनाचे स्वरूप केवळ तृप्त मनाने केलेल्या आयुष्याचे सिंहावलोकन नाही तर आतले आत ठसठसणाऱ्या जखमांनी विव्हळ झालेल्या अस्वस्थ मनाने केलेले कथन आहे. ती केवळ रंजनासाठी लिहिलेली नसून त्यांनी भोगलेल्या जीवनाची सत्य कहाणी आहे.''[१२] डॉ. वासुदेव मुलाटे यांचे मत योग्य वाटते कारण आत्मकथन हे खऱ्या अर्थाने दु:खाची गाथाच असते. आपल्या मनात घुसमटणाऱ्या खदखदणाऱ्या दु:खाला वाचा फुटावी ते दु:ख दुसऱ्याला सांगून आपले मन हलके करून घ्यावे यासाठी आत्मकथन लिहिले जाते. आत्मकथन केवळ रंजनासाठी लिहिले जात नसून त्यातून खऱ्या जीवनाची भोगलेल्या सुख-दु:खाची ती कहाणीच असते.

आत्मकथनातून आनंद मिळत नाही. प्रत्यक्ष जीवन जगताना व्यक्तीला समाजाचा आलेला अनुभव, जो त्रास सहन करावा लागतो, दलित समाजात जन्माला आल्यामुळे त्याला अनेक संकटांना सामोरे जात असताना अनेक ठिकाणी त्या व्यक्तीला मान-अपमान यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागते. एकंदरीत दलितांचे आयुष्य हे दु:खमय असल्याने आत्मकथनातून तेच चित्रित होते. म्हणूनच आत्मकथनाचे स्वरूप हे ठसठसणाऱ्या जखमांनी विव्हळ झालेल्या वेदनांचे चित्रण असते.

आत्मकथनाची संकल्पना स्पष्ट करताना डॉ. भालचंद्र फडके म्हणतात, ''आत्मकथन करणारा लेखक कालच्या जीवनाबद्दल लिहीत असतो. जो गतकाळ त्याच्यासमोर आहे त्यापासून दूर असलेला लेखक त्यातले चैतन्य शोधत असतो. आजच्या आत्मकथा निवेदक कालपासून दूर असल्यामुळे अनेक दृष्टीने निराळा आहे. सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवन जगणारा हा लेखक काल अगदी नगण्य होता.''[१३] आत्मकथन लिहिणारी व्यक्ती काल अगदी नगण्य होती. त्या व्यक्तींला राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांत कसल्याही प्रकारचे महत्त्व नव्हते. असे जीवन जगत होती. आज मात्र या सर्व क्षेत्रांत त्याचा वावर होतानां दिसतो. आज मागे वळून पाहताना तो त्या कालच्या जीवनातील जीवंतपणा शोधू पाहतो. या जीवंतपणाच्या शोधातून लिहिलेले लेखन म्हणून आत्मकथन होय. डॉ. भालचंद्र फडके यांची व्याख्या आत्मकथनाची संकल्पना स्पष्ट करण्यास योग्य वाटते.

डॉ. स. दा. कऱ्हाडे यांनी केलेली आत्मकथनाची व्याख्या पाहता येईल. ''स्वत:चे चरित्र लिहावयाचे एक प्रकारचे आत्मनिवेदन आत्मप्रकटीकरण आत्मकथन करण्यासारखेच आहे.''[१४] स्वत:चे चरित्र लिहिताना किंवा आत्मनिवेदन करताना आत्मप्रकटीकरण होते. त्याला आत्मकथन म्हणावे परंतु इथे त्यांनी वयाचा विचार केला नाही किंवा आत्मप्रकटीकरण करताना युवा मनाचा

विचार झाला नाही. त्यामुळे त्यांचे मत आत्मकथनाची संकल्पना स्पष्ट करण्याच्या योग्यतेची वाटत नाही. तर प्रा.चंद्रकुमार नलगे व डॉ.गंगाधर पानतावणे यांनी मांडलेले मत, ''कथन हे सातत्याचे प्रतीक आहे''[१५] तर कथा थांबते. आत्मकथनाचा प्रवास मात्र सुरूच असतो. नलगे व पानतावणे यांच्या मते कथेला शेवट असतो तर आत्मकथनाचा प्रवास चालू असतो. त्यांच्या मतानुसार आत्मकथन ही संज्ञा अधिक अर्थपूर्ण आहे.

आत्मकथनाच्या अनेक समीक्षकाच्या मतांवरून आत्मकथनाची संकल्पना व स्वरूप लक्षात येते. थोडक्यात आत्मकथन म्हणजे दैनंदिन जीवन जगताना आलेल्या दु:खद प्रसंगाचा मांडलेला इतिहास म्हणावा लागेल. कारण आत्मकथनात व्यक्ती स्वत:च्या गतजीवनाचा अनुभव घेऊन ती चांगला वाईट अनुभव दुसऱ्या व्यक्तींना सांगून मन हलके करीत असतो.

आत्मकथनातून आत्मकथनकार गतकाळातील आठवणी सांगत असतो. हा गतकाळ त्याच्या आयुष्याचा एक भाग असतो. या आठवणींचे तो कथन करीत असतो.

## १.६ आत्मकथन व आत्मकथा :

कथा, कविता, कादंबरी या वाङ्मयप्रकाराबरोबर आत्मकथा व आत्मकथन हे वाङ्मयप्रकार दलित साहित्यात निर्माण झाले आहेत. आत्मकथा व आत्मकथन हे शब्द प्रामुख्याने समानअर्थीच आहेत. मात्र या दोघांमध्ये मूलभूत असा फरक आहे. कथेला कुठेतरी शेवट असतो तर कथन हे सदैव चालू असते. आत्मकथनातून ज्या अनुभवविश्वाचे दर्शन होते ते अत्यंत करून व हृदयस्पर्शी असते. आत्मकथेत व आत्मकथनात मांडलेले अनुभव हे वास्तव स्वरूपाचे असतात. तर कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा आत्मकथन हा वाङ्मयप्रकार हृदयस्पर्शी वाटतो.

आजपर्यंत जे जीवनाचे दर्शन साहित्यातून कधीच येऊच शकले नाही. तो आत्मकथा व आत्मकथनाच्या स्वरूपामध्ये साहित्यात मांडले गेले आणि तेच साहित्याचा विषय झाले.

आत्मचरित्रामध्ये व्यक्तीच्या जीवनामध्ये घडून गेलेल्या घटनांची व प्रसंगांची नोंद असते तर आत्मकथनात प्रसंगाच्या व घटनांच्या नोंदीबरोबर कथन महत्त्वाचे असते.

## १.७ आत्मकथन व आत्मचरित्र यांतील फरक :

आत्मकथन व आत्मचरित्र यांच्यात काही मूलभूत फरक आहेत. आत्मचरित्र म्हणजे स्वत:च स्वत:चे लिहिलेले चरित्र होय. आत्मकथन हे उमेदीच्या काळातही लिहिले जाते. आत्मचरित्र हे आयुष्याच्या सायंकाळी लिहिली जातात. आत्मचरित्र हे व्यक्तीच्या कर्तृत्वाचा बहर संपल्यानंतर

जीवनाच्या सायंकाळी आपण केलेल्या कर्तृत्वाचा इतिहास आत्मचरित्रात आलेला असतो. आत्मकथनात मात्र कर्तृत्वाचा काळ चालू असतानाच, जीवन जगत असतानाच आलेल्या अनुभवांचे कथन असते.

आत्मकथन लिहिणारांची वये पाहता तशी चाळिशीतील असतात. आत्मचरित्रे मात्र आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात लिहिली जातात. आत्मचरित्र हे एकदाच लिहिले जाते. परंतु आत्मकथन मात्र अनेक भागांत लिहिले जाते. त्यांच्यात टप्पे केले जातात. एकंदरीत आत्मकथन म्हणजे आपल्या जीवनात आलेल्या सुख-दु:खाचे अनुभव इतरांना सांगून आपले मन हलके करण्यासाठी मांडलेला जीवन पट म्हणजे आत्मकथन होय.

आत्मचरित्र म्हणजे आपण अनुभवलेल्या जीवनाचे व केलेल्या कार्याचे पुन्हा स्मरण करून स्वत:च मांडलेला इतिहास म्हणजे आत्मचरित्र होय असे म्हणता येते.

## १.८ आत्मकथनांची वैशिष्ट्ये :

आत्मकथन हा वाङ्मयप्रकार वरकरणी एका व्यक्तीच्या जीवनाचा आलेख आहे असे वाटत असले तरी तो समग्र सामाजिक जीवनाचा आलेख अप्रत्यक्षपणे मांडणारा हा वाङ्मयप्रकार आहे. आत्मकथेतील मी सामाजिक जीवनाचा एक अविभाज्य घटक असतो. त्या सामाजिक जीवनाचे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, पारंपरिक संदर्भ अपरिहार्यपणे त्या कलाकृतीमध्ये समाविष्ट होतात.

आत्मकथनातून लेखकाची स्वत:ची जडणघडण अभिव्यक्त होत असते. आत्मकथन हा वाङ्मयप्रकार म्हणजे स्वत:च्या जीवनाची स्वत:च सांगितलेली कहाणी असते. लेखक स्वत:च्या जीवनात घडलेल्या प्रसंगाचा तपशील आत्मकथनात देत असतो. एका अर्थाने स्वत:च्या जीवनाचा व कर्तृत्वाचा लिहिलेला इतिहास म्हणजे आत्मकथन असे म्हणता येईल. त्यामध्ये समाजाला महत्त्वाचे स्थान आहे. अशा प्रकारच्या आत्मकथनाच्या आकृतिबंधावरून त्याची स्वतंत्र अशी वैशिष्ट्ये आपणांस सांगता येऊ शकतात.

### १) समाजचित्रण -

मनुष्य हा स्वाभाविकत: समाजशील प्राणी आहे. मनुष्याशिवाय समाज नाही व समाजशिवाय मनुष्य नाही असे म्हणावे लागते. प्रत्येक व्यक्ती ही समाजात राहून आपले जीवन व्यतीत करते. समाजात राहून तो सुखदु:खाचा अनुभव घेत असतो. कोणत्याही व्यक्तीची जडणघडण, व्यक्तिमत्त्व आजूबाजूच्या समूहातून, परिसरातून घडत असते. व्यक्ती आणि समाज एकमेकांना पूरक असतात.

आपल्या सुखदु:खांत समाजाला वाटेकरी करून घेणे ही समाजाची सहजप्रवृत्ती आहे. व्यक्ती ज्या कुटुंबात समाजात जन्माला येते त्या समाजाचा प्रभाव व्यक्तीवरती पडलेला असतो. त्याच समाजात ती व्यक्ती घडते. त्यातूनच त्याच्यावरती समाजमूल्यांचा संस्कार होतो. या सर्व सामाजिक संदर्भाचे आत्मकथनामध्ये प्रतिबिंब पडताना दिसते.

**२) संस्कृतिदर्शन -**

आत्मकथनाच्या वैशिष्ट्यांपैकी संस्कृतिदर्शन हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. प्रत्येक समाजाची एक संस्कृती असते. त्या संस्कृतीचा त्या समाजावरती ठसा उमटलेला असतो. व्यक्तीच्या जडणघडणींत संस्कृतीचा महत्त्वाचा वाटा असतो. व्यक्ती ज्या समाजात वाढते त्या समाजाची परंपरा रीतिरिवाज सणवार यांचे त्याच्या साहित्यातून चित्रण होत असते. आत्मकथनातून बऱ्याच अंशी व्यक्ती आपल्या समाजाच्या संस्कृतीचे चित्रण करीत असते नव्हे तर ते निवेदनाच्या ओघात अपरिहार्यपणे येत असते. आत्मकथनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणता येते.

**३) 'स्व' जाणीव -**

'मी' कुठून कुणातून कसा आलो ह्या संवेदनशील मनाला पडणाऱ्या जाणिवेतून आत्मकथन निर्माण होते. आत्मचरित्रातील नायक हा प्रतिनायक असतो. प्रथमत: तो स्वत:विषयी सांगत असला तरी स्वत:च्या समाजाविषयी अधिक उलघडा करून सांगत असतो. एकंदरीत नायकाच्या तोंडून स्वत:विषयीच्या आणि इतरांविषयीच्या जाणिवा व्यक्त होत जातात.

**४) ग्रामीण जीवन दर्शन -**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात निर्माण झालेल्या अनेक व्यक्तींच्या आत्मकथनाचा समग्र विचार केला तर असे दिसते की नागर समाजातील लेखकांनी लिहिलेल्या आत्मकथनाबरोबरच ग्रामीण जीवनातील लेखकांचीही आत्मकथने येऊ लागली आहेत. आजपर्यंत ज्या ज्या व्यक्तींनी आत्मकथन लिहिले त्या बहुतांशी व्यक्ती शहरी भागात स्थायिक झाल्या असल्याचे दिसले तरीही त्याच्या एकूणच व्यक्तिमत्त्वावरतील ग्रामीण भागातील संस्कृतीचा त्याच्यावरती प्रभाव पडलेला असतो. त्याचे बालपण हे खेड्यातच गेलेले असते. त्यामुळे त्यांच्या आत्मकथनातून येणारी भाषा ही ग्रामीण बोली भाषा आहे. कोणत्याही व्यक्तीने स्वत:चे विचार त्याच्या बोलीभाषेतून मांडले तर त्याला ते अधिक प्रभावीपणे मांडता येतात. त्याच्या भाषेतून अनेक ग्रामीण म्हणींचा यथायोग्य उपयोग करीत असतो. एकंदरीत आत्मकथनातून मोठ्या प्रमाणात ग्रामीणतेचे दर्शन घडते. ग्रामीण बोलीभाषेमुळे आत्मकथन हा

वाङ्मयप्रकार अधिक प्रभावी ठरला आहे. ग्रामीणता हे सुद्धा आत्मकथनांचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये ठरले आहे असे म्हणावे लागेल.

**५) व्यवसाय दर्शन -**

आत्मकथनातून व्यक्ती स्वत:च्या सुखदु:खाचा इतिहास मांडत असते. आत्मकथनकार आपल्या जीवनात येणारी सुखदु:खे मांडताना कोणतीही गोष्ट विस्मृतीत टाकत नाही. तो प्रामाणिकपणे मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. ते अनुभव त्याला त्याच्या व्यवसायातून आलेले असतात. उदा. कैकाडी समाजात केल्या जाणाऱ्या व्यवसायाचे चित्रण 'आयदान' किंवा 'उपरा'सारख्या आत्मकथनातून येते. त्याचबरोबर 'मी तो हमला' आप्पा कोरपे यांचा अनुभव किंवा 'कोल्हाट्याचं पोर' या सारख्या आत्मकथनांतून व्यवसायाचे दर्शन येते. बहुतांशी आत्मकथनांतून स्वत:च्या व्यवसायाचे दर्शन घडते.

**६) भूक व दारिद्रयाचे चित्रण :**

जीवनामध्ये जे अनुभव वाट्याला आले त्याचे वास्तववादी स्वरूपात चित्रण करणे ही आत्मकथनाची महत्त्वाची कसोटी मानली जाते. मराठीमधील बहुतेक आत्मकथन लेखन करणाऱ्या व्यक्तीं दारिद्र्य व गरिबीच्या चटक्याने होरपळून निघालेल्या आहेत. जीवनातील प्रत्येक प्रसंग हा त्यांच्यादृष्टीने मोठा लढा असतो. पोटात नेहमी भूकेचा डोंब असतो. दारिद्र्य तर त्यांच्या पाचवीलाच पुजलेले असते. या व्यक्तीच्या जीवनात बरेच प्रश्न हे भुकेपोटी निर्माण होतात. त्याचेच चित्रण आत्मकथनात येते. प्रत्येक आत्मकथनात भूकेचे व दारिद्र्याचे चित्रण येते म्हणून आत्मकथनाचे हे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानावे लागेल.

**७) स्त्री चित्रण -**

बऱ्याच आत्मकथनातून स्त्रियांचे दर्शन घडते. या मराठी आत्मकथनात आलेली स्त्री ही कष्टाळू, सोशिक, श्रद्धाळू अशा स्वरूपाचे जीवन जगते. पारंपरिक समाजव्यवस्थेने स्त्रीला तुच्छ लेखून तिच्यावरती अन्याय अत्याचार केले आहे. मग ही स्त्री दलित असो अथवा सवर्णातील असो ती परंपरेच्या बंधनातून मुक्त झालेली नाही. ती सतत आपल्या मुलाबाळांसाठी कष्ट उपसते. संसारासाठी झटणारी, नवऱ्यासाठी राबते. नवरा जरी व्यसनी सट्टाबाजी करणारा स्वार्थी असला तरी ती समजुतीने त्याला उभा करून संसासराचा गाढा ओढणारी आहे. अशा अनेक प्रकारच्या स्त्रियांचे चित्रण आत्मकथनातून होताना दिसते.

## १.९ साठोत्तरी मराठी आत्मकथनांची वाटचाल :

मराठी साहित्यात स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक वाङ्मयप्रकार उदयास आले. तथापि अगदी अलीकडच्या काळात उदयास आलेला वाङ्मयप्रकार म्हणजे आत्मकथन होय. हा वाङ्मयप्रकार दलित साहित्याच्या माध्यमातून पुढे आला. त्याची वाटचाल कशी झाली, आत्मकथन हा वाङ्मयप्रकार प्रथमत: कुणी हाताळला याबाबत नेमके एकमत नाही. परंतु काही समीक्षकांच्या मतानुसार व संदर्भानुसार आत्मकथनांची वाटचाल मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

आत्मकथनांची वाटचाल ही खरे पाहता समाजातील उपेक्षितांच्या जीवनाच्या चित्रण करण्याच्या प्रेरणेतून झाली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. दलित आत्मकथनांची बिजे एका वार्षिक अंकात सापडतात. तो वार्षिकांक म्हणजे मिलिंद महाविद्यालय औरंगाबादचा वार्षिकांक होय. १९६४ या वार्षिकांकामध्ये प्र. इ. सोनकांबळे यांचा 'वाटाड्या' नावाचा एक आत्मकथनपर लेख प्रसिद्ध झाला.

त्या लेखनातून दलितांच्या आत्मकथन लेखनाची सुरुवात झाली असे म्हणावयास हरकत नाही. पुढे अशाच प्रकारचे लेख प्र. इ. सोनकांबळे यांनी लिहिले आणि त्यातूनच त्यांचे 'आठवणींचे पक्षी' हे आत्मकथनपर लेखांचे पुस्तक प्रसिद्ध झाले. मात्र 'आठवणींचे पक्षी' ग्रंथरूपाने येण्याच्या अगोदर दया पवारांचे 'बलूतं' प्रसिद्ध झाले. 'बलूतं' हे २४ डिसेंबर १९७८ रोजी प्रकाशित झाले. याच आत्मकथनाने मराठीतील आत्मकथनांची वाट समृद्ध केली. प्रस्तुत आत्मकथनाला फोर्ड फाउंडेशनचे अवार्ड मिळाले. त्याचबरोबर हिंदी, कन्नड, गुजराती या भाषांप्रमाणेच जपानी व जर्मनी या पाश्चात्त्य भाषांमध्ये अनुवाद झाले. पुढे त्यावरती 'अत्याचार' नावाचा चित्रपटही निघाला.

दगडू मारुती पवार यांनी 'बलुतं' या आत्मकथनातून केवळ स्वत:चे अनुभव मांडले नसून महार या समाजाचे वास्तव चित्रण आले आहे. 'बलुत' च्या मागोमागच 'आठवणींचे पक्षी' प्रसिद्ध झाले. तसे पाहता बलुतंच्या अगोदर त्यांचे अस्मितादर्शक नियतकालिकेतून ते प्रसिद्ध झाले होते. पण पुस्तकरूपाने बलूतंच्या नंतर आले ते सुद्धा खूप गाजले. त्याच्यावरती सुद्धा अनेक परिसंवाद चर्चा झाल्या.

या दोन्ही आत्मकथनांच्या मागोमाग माधव कोंडविलकर यांचे 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' हे आत्मकथन जुलै १९७९ ला प्रसिद्ध झाले. त्यांनी चांभार समाजातील लोकांचे जीवन चित्रित केले आहे. याही आत्मकथनाची साहित्यजगतांनी चांगली दखल घेतली.

गावकुसाबाहेरील जीवनाचे दर्शन घडविणारी ही आत्मकथने येत असतानाच इतर समाजांतील आत्मकथने येऊ पहात होती. कैकाडी समाजाचे चित्रण करणारे लक्ष्मण माने यांचे 'उपरा' आत्मकथन डिसेंबर १९८० मध्ये आले व भटक्या जमातींतील कैकाडी या जमातीतील समाजाचे वास्तव चित्रण केले. 'उपरा' या आत्मकथनास पुढे आंतरराष्ट्रीयच प्रसिद्धी मिळाली.

मातंग समाजाची दु:खे सांगणारी गाथा म्हणजे उत्तम बंडू तुपे यांचे 'काट्यावरची पोटं' १९८१ मध्ये प्रकाशित झाले. पोटाची भूक भागवण्यासाठी मातंग समाजाला करावा लागणाऱ्या संघर्षाचे चित्रण या आत्मकथनात आले आहे. याच वर्षी १९८१ मध्ये शंकरराव खरात यांचे 'तराळ अंतराळ' हे आत्मकथन प्रसिद्ध झाले. तीन भागांत हे आत्मकथन लिहिले आहे. यामध्ये महार जातीची दु:खे मांडली आहेत. आत्मकथन लेखनात जसे पुरुष होते तशा स्त्रियांनी सुद्धा याकाळात आत्मकथने लिहिली. त्यांच्यामध्ये पहिल्यांदा नाव घ्यावे लागते ते प्रा. कुमुद पावडे यांचे मार्च १९८१ मध्ये 'अंत:स्फोट' होय. या आत्मकथनाचा उल्लेख करावा लागतो.

या आत्मकथनाच्या मागोमाग नानासाहेब झोगडे यांचे १९८२ मध्ये 'फांजर' हे आत्मकथन प्रसिद्ध झाले. त्याच्यानंतर दादासाहेब मल्हारी मोरे यांचे 'गबाळ' हे आत्मकथन प्रकाशित झाले. या आत्मकथनात पिंगळ-जोशी या भटक्या जमातीतील पाठीला पोर बांधून सतत बिऱ्हाड घेऊन गावोगाव फिरणाऱ्या एका तरुणाच्या जिद्दीचे व त्याने शिक्षण घेऊन केलेल्या प्रगतीचे चित्रण येथे आले आहे.

मुक्ता सर्वगोड यांचे 'मिटलेली कवाडे' नोव्हेंबर १९८३ ला प्रकाशित झाले. महार समाजाचे मागसलेपण, शिक्षणाच्या बाबतीत त्यांची उपेक्षा, आर्थिक विपन्नता आणि दास्यत्व यांचे चित्रण केले आहे. १६ नोव्हेंबर १९८३ साली रुस्तुम अचलखांब यांचे 'गावकी' हे आत्मकथन प्रसिद्ध झाले. या आत्मकथनातून दलित समाजातील विविध चालीरीती, विधी, संस्कार यांची महत्त्वपूर्ण माहिती मिळते. जालना बुलढाणा परिसरातील म्हारीबोलीतून या आत्मकथनाचे लेखन झालेले दिसते.

'गावकी' या आत्मकथनानंतर १५ जुलै १९८४ मध्ये पार्थ पोळके यांचे 'अभरान' हे आत्मकथन प्रसिद्ध झाले. हे आत्मकथन म्हणजे पोतराज म्हणून भीक मागत फिरणाऱ्या बापाच्या पोटी जन्मलेल्या परंतु उच्चशिक्षण घेऊन सामाजिक चळवळीत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्याची आत्मकथा आहे. त्यांच्या समाजातील लोकसमज, अंधश्रद्धा, चालीरीती, अधार्मिक जीवन, जत्रा यांचे चित्रण 'अभरान' मध्ये केले आहे. याचकाळात २० जुलै १९८४ ला शरणकुमार लिंबाळे यांचे 'अक्करमाशी' हे आत्मकथन प्रकाशित झाले. इतर आत्मकथनकारांच्यापेक्षा वयाने लहान असलेल्या लेखकाचे हे आत्मकथन आहे. लिंबाळे यांनी आपल्या जीवनाची परवड यातून चित्रित केली आहे.

मे १९८५ मध्ये श्रीरंग तलवारे यांचे 'धुळपाटी' हे आत्मकथन प्रसिद्ध झाले. त्याच्यानंतर 'कोंडाळ' १९८६ ला प्रा. तुषार भाग्यवंत यांचे आत्मकथन प्रसिद्ध झाले. १४ नोव्हेंबर १९८६ ला ल. स. रोकडे यांचे 'झळा' या आत्मकथनाच्या मागोमाग १९८६ 'माझ्या जन्माची चित्तरकथा' हे शांताबाई कृष्णाजी कांबळे या लेखिकेचे आत्मकथन विशेष गाजले. त्यांच्याच पावलावरती पाऊल ठेवून चालणाऱ्या 'जिणं आमुचं' म्हणणाऱ्या सौ. बेबी कांबळे यांचे आत्मकथन म्हणजे दलित स्त्रीच्या दुःखाची कहाणी म्हणावी लागेल. त्याचबरोबर इतर आत्मकथनांच्या पंगतीतले आत्मकथन म्हणजे पांडुरंग उमाजी जाधव यांचे 'माहुडा' हे १९८६ साली प्रसिद्ध झाले. बेरड जातीची सुख-दुःखे मांडणारे आत्मकथन म्हणजे भिमराव गस्ती यांचे 'बेरड' हे आत्मकथन प्रसिद्ध झाले. याच वर्षी म्हणजे १९८७ ला लक्ष्मण गायकवाड यांचे बहुचर्चित व साहित्यक्षेत्रात विशेष यश लाभलेले 'उचल्या' आत्मकथन. माणूस जन्मताच गुन्हेगार ठरणाऱ्या उचल्या किंवा पायरुड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जमातीचा परिचय करून देणारे असे हे आत्मकथन आहे.

'बेरड' व 'उचल्या' या आत्मकथनाच्या मागोमाग एका भटक्या जमातीचे आत्मकथन मराठी साहित्याच्या क्षेत्रात प्रवेश करते झाले ते म्हणजे १९९० साली प्रसिद्ध झालेले आत्माराम राठोड यांचे 'तांडा' हे आत्मकथन होय. याच दरम्यान 'ख्रिस्तीमहार' (१९९०) हे बाबासाहेब गायकवाड यांचे आत्मकथन आले.

१९९३ च्या दरम्यान 'मरणकळा' या एकाच नावाने दोन आत्मकथने प्रसिद्ध झाली. द. शि. सवाखंडे यांचे आणि रानोमाळ पाठीवर पालं बांधून भटकणाऱ्या समाजातील एका शिक्षिका असणाऱ्या जनाबाई कचरू गिऱ्हे यांचे एक 'मरणकळा' होय.

त्याचबरोबर नरेंद्र जाधव यांचे 'आमचा बाप आणि आम्ही' हे आत्मकथन प्रसिद्ध झाले. त्यांचेही आत्मकथन इतर अनेक भाषांत भाषांतरित झाले. त्याच्यानंतर कोल्हाटी समाजाचे दुःख सांगणारे एक लक्षवेधी आत्मकथन १९९४ ला किशोर शांताबाई काळे यांचे 'कोल्हाट्याचं पोर' आत्मकथन होय. त्याच्यानंतर आर. के. त्रिभुवन यांचे 'दे दान सुटे गिऱ्हाण', वैजनाथ कळसे यांचे 'ऐरणीच्या घणा', प्रल्हाद चेंदवनकरांचे 'टाच', गौतम कांबळे यांचे 'बावळट', भीमराव जाधव यांचे आत्मकथन 'काटेरी तारेच्या कुंपणाची', चंद्रकांत जाधव याचे 'ढगा आडचा चंद्र', रामराव झुंजारे यांचे 'झुंज' (१९९८) आणि रतनलाल सोनग्रा यांचे 'सोनजातक', नजुबाई गावीत यांचे 'अदोर' (१९९८), विजय शिरसाट 'कुस्ती', राम दतोदे 'जेव्हा रापी बोलू लागते', शशिकांत तासगावकरांचे 'घरान आमच तमासगिराचं', केशव मेश्राम यांची 'हकिकत व जटायू', विमल मोरे यांचे 'तीन दगडाची

चूल', अगदी अलीकडच्या काळात प्रसिद्ध झालेले आत्मकथन म्हणजे ऊर्मिला पवार यांचे 'आयदान'. अशी या आत्मकथनांची वाटचाल दिसते. उल्लेखनीय आत्मकथनांचा थोड्या प्रमाणात विस्ताराने उल्लेख करण्याचा प्रयत्न केला आहे.

वरील आत्मकथनात काही पुरुषांची तसेच काही स्त्रियांची आत्मकथनेही आहेत. शिवाय ग्रामीण भागातील आत्मकथनांचा विचार करण्यात आला आहे. या आत्मकथनांचा विचार करण्यात आला आहे. या आत्मकथनांत प्रामुख्याने डॉ. आनंद यादव यांचे 'झोंबी' (१९८७), 'नांगरनी' व 'घरभिंती' ही आत्मकथने तीन भागात प्रकाशित झाली. त्यांनी मराठीतील आत्मकथनाची पायवाट घातली असे म्हणल्यास वावगे ठरू नये. त्याच्यानंतर रा. ना. झोळ यांचे 'रामप्रहार' (१९८४-८५), अप्पा कोरपे यांचे 'मी तो हमालं' (१९९२), राम नगरकरांचे 'रामनगरी', प्रा. व. बोधे यांचे 'कोकरउड्या' (१९९३) व 'रानपालखी' (२००३), ज्ञानेश्वर मुळे यांचे 'माती पंख आकाश' अशा आत्मकथनांचा उल्लेख करता येईल. आत्मकथनांची वाटचाल मांडण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला आहे.

## १.१०. निष्कर्ष :

१) आत्मकथन हा वाङ्मयप्रकार जीवनाच्या मावळतीला लिहावयाचा नसून जीवनाच्या कोणत्याही टप्प्यावर हाताळला जाऊ शकतो.

२) आत्मचरित्र म्हणजे व्यक्तीच्या कर्तृत्वाचा आलेख संपल्यानंतर जीवनाच्या शेवटच्या टप्प्यात घडून गेलेल्या गतजीवनाचा इतिहास होय.

३) आत्मकथनांची भाषा ही प्रमाणभाषा न येता प्रादेशिक बोलीभाषा आहे. त्या भागातील बोलीभाषांचे दर्शन आत्मकथनात येते. त्यामुळे ग्रामीण भाषाशैलीचे काही विशेष या आत्मकथनात्मक पहावयास मिळतात.

४) आत्मकथनातून विशेषत: दारिद्र्याचे व भुकेचे चित्रण येताना दिसते.

५) आत्मकथनातून व्यक्तीच्या समाजाचे त्याचबरोबर समाजाच्या चालीरीतीचे संस्कृतीचे दर्शन घडते.

६) मराठी वाङ्मयामध्ये ज्या आत्मकथनांनी अत्यंत मोलाची भर घातली आहे ती आत्मकथने फक्त ग्रामीण दलित समाजात जीवन जगताना आलेले विविध अनुभव अत्यंत वास्तववादी पद्धतीने रेखाटले आहे.

७) या आत्मकथनाने मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली आहे.

## १.११ संदर्भ टिपा :


१. धर्माधिकारी पुरुषोत्तम दिगंबर : 'वाङ्मयीन सिद्धांत', अजब प्रकाशन, १९७८, पृ. ६१

२. बोरगावकर व. रा. : 'प्राचीन मराठीतील चरित्रलेखन', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, १९७८, पृ. २७८

३. डहाके वसंत आबाजी : 'शालेय शब्दकोश मराठी' २००२, पृ.२८

४. जोशी अ. म. : 'चरित्र-आत्मचरित्र', सुविचार प्रकाशन, पहिली आवृत्ती, १९५६, पृ.१०३

५. बोरगावकर व. रा. : 'प्राचीन मराठीतील चरित्रलेखन', उनि. पृ. २९९

६. साहित्यसूची, 'आत्मचरित्र व चरित', दिवाळी अंक, साहित्यसूची १९८७, पृ. १४७

७. साहित्यसूची मराठीतील काही आत्मचरित्रे 'काही विचार' दिवाळी अंक, १९८७, पृ. ११

८. कऱ्हाडे सदा : 'चरित्र आणि आत्मचरित्र', लोकवाङ्मयगृह, १९७६, पृ. १०१

९. जाधव रा. ग. : 'नीळी पहाट', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७८, पृ. ४७

१०. भालेराव विमल : 'आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक अभ्यास', साहित्यप्रसार केंद्र, १९८५, पृ. १६

११. मुलाटे (डॉ.) वासुदेव : 'सहा दलित आत्मकथने : एक मुक्त चिंतन कैलास', १९८५, पृ. ३

१२. मुलाटे (डॉ.) वासुदेव : उनि. पृ. ६१

१३. फडके भालचंद्र : 'अलीकडची आत्मचरित्र' रू म. सा. पं. १९७६ एप्रिल, मे, जून, पृ. १८

१४. कऱ्हाडे सदा : उनि. पृ. १०९

१५. नलगे चंद्रकुमार, पानतावणे : 'दलित आत्मकथन प्रस्तावना' सुरेश एजन्सी, पुणे, १९८६, पृ.५

१६. कुसरे कुलकर्णी (डॉ) सौ. आरती : 'दलित स्वरूपकथने' साहित्य रूप, प्रथम आवृत्ती १९९१, पृ. ५० ते १०७


-----x-----